बीड । जालना । छ. संभाजीनगर । पुणे । अहमदनगर । यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → सोमवार दि.१३ जानेवारी २०२५ → वर्ष ९ वे → अंक -१६३ → पाने ४ → किंमत २ रु

Beed / Jalna/ Chatrapati Sambhajinagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Monday Date: 13 January 2025 → 9 th Year → 163Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नैतिकतेला धरून गृहखात सोडावं व मंत्री धनंजय मुंडेचा राजीनामा घ्यावा




बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
लोकनायक
संपादक - भारत गायकवाड




# जाती-जातीत भांडण लावून माणूस माणसात ठेवला नाही

## आका-आकाचा आका-सगळ्यात मोठा बोका पण सामील

**राज्यात बीड जिल्ह्याचे नाव आणि जिल्ह्यात परळी तालुका सध्या गाजत असून मागील महिन्यात झालेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा प्रकरण ताजं असतानाच राख माफी यांनी अजून एका सरपंचाचा बळी घेतला आहे परवा रात्री नऊ वाजून वीस मिनिटांनी ही घटना घडली असून अभिमन्यू क्षीरसागर यांचा जागीच मृत्यू झालेला आहे हा मृत्यू अपघात नसून घातपात असल्याची टीका आमदार सुरेश धस यांनी केलेली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करून प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला असला तरी परळीचे एक एक कारणामे पुढे येत असून मराठा वंजारी वाद हिंदू मुस्लिम वादापेक्षा जास्त मोठा होताना दिसत आहे. माणसात माणूस राहिला नसून नैतिकतेला धरून देवेंद्र फडणवीस यांनी गृह खात सोडा व धनंजय मुंडे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घ्यावा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.**



**लोकनायक वृत्तसेवा** – याबाबत सविस्तर वृत्त असे की मस्स-जोग गावचे सरपंच मयत संतोष देशमुख यांची हत्या मागील महिन्यात करण्यात आलेली होती त्यातील एक आरोपी वगळता जवळपास सगळे आरोपी अटक असून परळी तालुक्यात आणखी एक घटना घडली असून मिरवट फाट्यावर अवैध राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा बळी घेतला असून **(पान २ वर)**

### आकावर मोक्का लागावा- आ. सुरेश धस

**सरपंच सुरेश देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड (आका) सोडून इतर सर्व आरोपींवर मोक्का लावण्यात आलेला आहे. आमच्या अपेक्षा आहेत की आकाश सुद्धा ३०२ मध्ये यावा व त्याच्यावर सुद्धा मोक्का लागावा**



## अवांतर भुर्दंडापासून नागरिकांची सुटका

### एस.एम.युसूफ़ यांनी प्रसिद्धी माध्यमांचे मानले आभार

**लोकनायक वृत्तसेवा** – शासकीय कामकाज आणि विविध प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी आता यापुढे बॉण्ड ची गरज नाही. ५०० चाच नाही तर १०० रुपयांचा बॉण्ड सुद्धा लागणार नाही. राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांनी अशा सूचना व स्पष्ट निर्देश जारी केले आहेत. यामुळे या मुद्द्यावर दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्धी माध्यमातून लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी प्रसिद्धी माध्यमांचे विशेष आभार व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासनाने १००-२०० रुपयांचे बॉण्ड रद्द करून त्याऐवजी ५०० रुपयाचा बॉण्ड लागू केला होता परंतु ५०० रुपयाचे बॉण्ड हवे त्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत नव्हते. यामुळे नागरिकांना बॉण्ड विक्रेत्याकडून १०० रुपयांचे ०५ बॉण्ड घेऊन आपली कामे करून घ्यावी लागत होती. याकरिता त्यांना बॉण्ड विक्रेत्याकडे ५५० रुपये मोजावे लागत होते. लिखाण कामासाठी फक्त ०१ बॉण्ड लागत असूनही त्यासोबत ०४ बॉण्ड चक्क कोरे जोडावे लागत होते. यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि मानसिक कुचंबना होत होती. ही बाब लक्षात घेऊन एस.एम.युसूफ़ यांनी दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी मुद्रांक बाजारात ५०० च्या बॉण्डचा भयंकर तुटवडा; १०० च्या बॉण्डचा आलाय ऊत, हे शासनाचे सुशासन की सुडासन? या शीर्षकाने बातमी प्रसिद्धीस दिली होती. ही बातमी प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित झाली. याची शासन-प्रशासन दरबारी नोंद घेतली जाऊन ०१ महिन्याच्या आत राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांनी आता शासकीय कामकाजासह, विविध प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी बॉण्ड ची गरज नसल्याचे पत्र काढून सूचना व स्पष्ट निर्देश जारी केले आहे. यामुळे नागरिकांना आता यापुढे बॉण्डसाठी अवांतर खर्चाचा भुर्दंड सोसावा लागणार नाही. या मुद्द्याला प्रसिद्धी माध्यमांनी प्रकाशित केल्याने हा निर्णय लागू झाल्याचे मत या मुद्द्याकडे लक्ष वेधणारे एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले असून प्रसिद्धी माध्यमांचे विशेष आभार मानले आहे.



**एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)**
**आसेफ़नगर, बीड**
**संपर्क - ९०२१ ०२ ३१२१**

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जालना येथे युवा दिन साजरा

**लोकनायक वृत्तसेवा** -हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक शिक्षण संस्था जालना येथे आज दिनांक १२/०१/२०२५ रोजी राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने संस्थेत उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी व प्रसिद्ध उद्योजक मा.श्री. रत्नाकर पाडळे (पुजा रोटोमेक प्रा.लि. जालना.) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमात युवा सशक्तीकरण, मानसिक आरोग्य,स्वच्छता अभियान व संस्थेचे यशस्वी उद्योजक **(पान २ वर)**



## भाजपच्या अशिश शेलार मंत्र्याची शरद पवारांवर जहरी टीका, गाढवाचा उल्लेख

**शिर्डी / लोकनायक वृत्तसेवा** – भारतीय जनता पक्षाचे आमदार आणि मंत्री आशिष शेलार यांनी शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल चढवला आहे. विधानसभा निवडणुकीत पवारांनी केलेल्या चुकांचा पाढा वाचत त्यांनी पवारांवर टीकास्र सोडलं. शरद पवार यांच्या पक्षाची अवस्था गाढवांच्या सल्लानुसार चा-लणाऱ्या पक्षाप्रमाणे झाली आहे, अशी जहरी टीका त्यांनी केली. शिर्डीत भाजपचं राज्यस्तरीय महाधिवेशन पार पडत आहे. या कार्यक्रमातून आशिष शेलार यांनी शरद पवारांसह उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांवर बोचरी टीका केली आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रसंग सांगता आशिष शेलार म्हणाले, शरद पवारांनी कुणाकुणाची मदत घेतली नाही. मित्र पक्ष म्हणून त्यांनी महाविकास आघाडीची मदत घेतलीच. पण त्यांनी मदतीला काही भाटही पाळले होते. या भाटांनी त्यांना सांगितलं भाजप ६० पेक्षा पुढे जाणारच नाही, पण आम्हाला बहुमत मिळालं. **(पान २ वर)**



## पाणीटंचाईच्या कृती आराखड्यात बीड मतदारसंघातील गाव आणि वस्त्यांचा सामावेश करा

### आ.संदीप क्षीरसागरांकडून १६७ गाव आणि वस्त्यांवर हातपंप, बोअरवेलची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा** -जानेवारी २०२५ ते जून २०२५ या काळातील पाणीटंचाईच्या निवारणासाठी कृती आराखडा तयार करून त्यामध्ये बीड मतदारसंघात क्षेत्रातील एकूण १६७ गाव आणि वाडी, वस्त्यांवर नवीन हातपंप बसवणे, बोअरवेल घेणे तसेच जुने हातपंप दुरूस्त करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

जानेवारी ते जून महिन्याचा कालावधी हा उन्हाळ्याचा असतो. या कालावधीमध्ये बीड जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण होते. पाण्याअभावी नागरिक, शेतकरी आणि पशु-पक्षी यांना वणवण करावी लागते. त्यामुळे पाणीटंचाईचे निवारण करण्यासाठी वेळेअगोदर नियोजन करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीतील होणार्या पाणीटंचाईच्या निवारणासाठी कृती आराखडा तयार करून त्यामध्ये बीड मतदारसंघात क्षेत्रातील गाव आणि वाडी, वस्त्यांवर नवीन हातपंप बसवणे, बोअरवेल घेणे, जुन्या हातपंपाची दुरूस्ती करणे, बंद बोअरवेल सुरू करणे आदी बाबी सामाविष्ट करण्याची मागणी **(पान २ वर)**














लोकनायक

सोमवार दि.१३ जानेवारी २०२५



# ई टी एस मोजणीच्या अहवालामुळे रेल्वे कंत्राटदारासह भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये हडकंप

# महसूल वर्तुळातील लालची बाबूची रेल्वे कंत्राटदार कनेक्शन पोलखोल

**लोकनायक वृत्तसेवा** –: वर्धा – यवतमाळ – नांदेड नवनिर्मित रेल्वे प्रकल्पाच्या उत्खननातील गौण खनिज भ्रष्टाचार प्रकरणात अमोल कोमावार (व्हीसल ब्ल- ोअर् ) यांनी इ. टी. एस.मोजणीची मागणी केल्यामुळे रेल्वे कंत्राटदार उपकंत्राटदार तसेच राज्य शासनाच्या महसूल विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये कारवाईच्या भीतीने हडकंप सुटलेला दिसत आहे . सविस्तर वृत्त असे की, वर्धा यवतमाळ नांदेड नवनिर्मित रेल्वे प्रकल्पाच्या विकासाचे काम सध्या यवतमाळ जिल्ह्यातील ता.कळंब पासून यवतमाळ तालुक्यातील मौजे गोधनी पर्यंत केंद्र शासनाच्या रेल्वे विभागामार्फत काम चालू आहे. या परिसरात गेल्या तीन ते चार वर्षापासून फक्त हर्षिता कन्स्ट्रक्शन कंपनीचे रेल्वे कंत्राटदारा मार्फत रेल्वे विकासाचे काम चालू आहे.

परंतु यांच्या कामात अनेक अनियमितता असल्याबाबतचे पत्र संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या वर सुद्धा आतापर्यंत त्यांच्यावर राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांकडून कारवाई केल्या गेलेले नाही तत्कालीन खासदार श्रीमती भावनाताई गवळी यांनी सुद्धा हर्षिता कन्स्ट्रक्शन कंपनीच्या अनियमितेबाबत दिल्ली संसदेमध्ये तक्रार केलेली होती. परंतु त्या प्रकरणाला आर्थिक व्यवहाराने दडपण्यात आले. ,सचिन नामक एका नामवंत यवतमाळच्या दलाला मार्फत या हर्षिता कंपनीच्या अनियमितते बाबतीत करोडो रुपयाचे दंडात्मक कारवाईची प्रकरणे संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून सेटल केल्याची महसूल वर्तुळात चांगली चर्चा आहे. सध्या हर्षिता कन्स्ट्रक्शन कंपनीचा एक एम्प्लॉईज आणि कळंब तहसील कार्यालयातील लालची बाबू रोज संध्याकाळी स्पेशल बैठकीत बसून अनेक गैरप्रकार खुलेआम करीत असल्याबाबतची चर्चा गेल्या अनेक दिवसापासून परिसरात गाजत आहे. शासनाच्या कारवाई बाबतची दस्तावेज, कायद्याच्या चाकोरीत बसून गैरप्रकार कसे करता येईल याबाबतचे चर्चा, कंपनीचा कसा फायदा होईल याबाबत अनेक विषयावर चर्चा करून शासनाचा महसूल बुडविल्या जात असून तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना मूर्ख बनविल्या जात आहे. परिसरात व महसूल विभागात या जोडीला –ण फायनान्स या नावाने ओळखल्या जाते.

या सर्व रेल्वे विकास कामाच्या नावाखाली करोडो रुपयाची नैसर्गिक संपत्ती नष्ट केल्या जात असून करोडो रुपयाची कमाई दर दिवशी करून लाखो रुपयांचा महसूल दर दिवशी बुडविल्या जात आहे. नंबर प्लेट लावलेल्या ट्रक मधून गौण खनिजाची केलेली वाहतूक बिना नंबरच्या ट्रक मधून केलेली वाहतूक, मंजुरात गट ,भरलेल्या रॉयल्टी, सपाटी करणाच्या परवानग्या, वाहतूक परवाना, तलाठी व मंडळ अधिकारी यांचे अहवाल, ई.टी.एस मोजणी चा अहवाल याबाबत वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्याची गरज आहे. परंतु या संदर्भात यातील तक्रारदार अमोल कोमावार ( व्हीसल ब्लोअर् ) यांनी संदर्भीय विषयाच्या अनुसरून इ टी एस मोजणीची तक्रार केल्यामुळे व सतत पाठपुरावा करून मागणी धरून लावल्यामुळे कारवाईच्या भीतीने संबंधित भ्रष्ट अधिकारी व रेल्वेच्या कंत्राटदारामध्ये हडकंप सुटलेला दिसत आहे. त्याचबरोबर संबंधित सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी सुद्धा यातील तक्रारदार अमोल कोमावार( व्हीसल ब्लोअर् )



यांनी केली असल्याचे माहितीत आहे त्यामुळे या प्रकरणात वरिष्ठ स्तरावरून पारदर्शकपणे चौकशी तसेच सक्त कारवाई व्हावी अशी जनसमान्यातून प्रतिक्रिया उमटत आहे.

# आ सुरेश धस यांच्या समर्थक रस्त्यावर उतरून आंदोलन करु - सोनालीताई येवले

मस्साजोग चे लोकप्रिय सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण खुन प्रकरणात आ सुरेश यांनी आवाज उठवुन दहशत व सत्तेचा वापर धाकडपशाहीला लगाम लावला असल्याने लोकनायक आ सुरेश धस यांची समाजमाध्यमावर बदनामी व राष्ट्रवादी काँग्रेसचे काही पदाधिकारी यांच्या कडुन बिन बुडाचे आरोप होत आहेत.ही बदनामी थांबवा नसता समर्थक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील असा इशारा डोंगरकिन्ही येथिल आ सुरेश धस समर्थक महिला कार्यकर्त्या सौ सोना- लीताई येवले - पाटोळे यांनी दिला आहे.

आ सुरेश धस हे एक वैचारिक प्रगल्भता असलेले लोकप्रतिनिधी आहेत. आष्टी मतदारसंघात च नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वमान्य लोकप्रिय आमदार आहेत.बीड जिल्ह्यात पंधरा वर्षापासून गुंडा राज,खंडणी राज चालु आहे.मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वाल्मीक कराड व त्यांची गँग दहशती खाली खंडणी राज चालवत आहेत.यातुनच मस्साजोग येथिल सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे खुन करण्यात आला.येथे माणुसकी ओशाळेल अशी अमानुषपणे मारहाण करून हत्या झाली.या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी संपुर्ण महाराष्ट्रात संताप व्यक्त केला जात आहे.

यात आष्टी मतदारसंघाचे लोकनायक आ सुरेश धस यांनी जिवाचे रान करुन विधानसभेत व रस्तावरही आवाज उठवला आहे.

खंडणीखोर वाल्मीक कराड



यांच्या दहशतीचा पाढा आ सुरेश धस वाचत आहेत नव्हे तर या सर्व आरोपींना धनंजय मुंडे व मंत्री पंकजाताई मुंडे यांचे संरक्षण आहे.याच पाठबळावर मुंडे व कराड समर्थक काही नीच औलादी आ सुरेश धस यांची समाजमाध्यमावर बदनामी करत आहेत.तसेच राष्ट्रवादी चे आ अमोल मिटकरी,सुरज चव्हाण,रुपाली चाकणकर हे आ सुरेश धस यांच्या वर बेछुटपणे आरोप करत आहेत.

या सर्वांचे सोक्षमोक्ष लावु परंतु आम्हाला संतोष देशमुख यांच्या हत्येतील विषयावरुन दुसरी कडे संघर्ष करायचा नाही.

आमचे नेते सुरेश धस यांची समाजमाध्यमावर होणारी बदनामी बगलबच्चे व हुरड्याफुक्यांनी थांबवावी नसता रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल असा इशारा डोंगरकिन्ही येथिल आ सुरेश धस यांच्या समर्थक सौ सोनालीताई येवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलाआहे.

# हृदय विकारांच्या रुग्णांसाठी डॉ.महेश शहा व डॉ.संदीप चौरसिया ठरताहेत यमदूत

लोकनायक वृत्तसेवा दिवसेंदिवस खानपानामध्ये बदल होत असल्याने हृदयविकाराचा त्रास अनेकांना जाणवत आहे. आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करण्यासाठी अनेक जण हृदयरोग तज्ञ डॉक्टरांना दाखवण्याचा सल्ला देत असून अँजिओग्राफी,अँजिओप्लास्टी यासारखे उपचार डॉक्टर सांगत आहे.मात्र डॉक्टरांना देवदूत समजल्या जात असून यवतमाळ मध्ये मात्र हृदय रोग तज्ञ अस- लेले दोन प्रसिद्ध डॉक्टर यांच्याकडून रुग्णांना अँजीओप्लास्टी केल्यानंतर थेट यम सदनी पाठविण्याचे काम डॉ.महेश शहा तसेच डॉ.संदीप चौरसिया यांच्याकडून केल्या जात असल्याचा प्रत्यय अनुभव अनेकांना येत आहे. मागील तीन महिन्यांमध्ये आत्तापर्यंत डॉ.शहा यांच्या हॉस्पिटल मधून १३ रुग्णांचा अँजीओप्लास्टी केल्यानंतर मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार घडलेला आहे.याला सर्वस्वी दोन्ही डॉक्टर जबाबदार असून यांचेवर कठोर कारवाई करावी असे रुग्णांच्या नातेवाईकांकडून बोलल्या जात आहे.मात्र तक्रार करण्यास कोणीही पुढे येत नसल्याच्या कारणाने या दोन डॉक्टर सर्रासपणे रुग्णांकडून तसेच शासकीय योजनेच्या अंतर्गत अनेक रुग्णांकडून लुट करत असल्याचेही दिसत आहे.विशेष म्हणजे डॉ.महेश शहा यांचे रुग्णालय शासकीय योजना राबविल्या जात असून या ठिकाणी महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून अनेक रुग्णांना मंजूर केल्या जात आहे.मात्र यानंतरही रुग्णांकडून पैसे



आकारल्याचेही रुग्णांच्या नातेवाईकांकडून बोलल्या जात आहे.विशेष म्हणजे डॉ. संदीप चौरसिया हे यवतमाळतील शासकीय रुग्णालयात तसेच प्रख्यात हिराचंद मुनोत मेमोरियल क्रिटी केअर हॉस्पिटल येथे सुद्धा हृदयरोग तज्ञ म्हणून तपासणीचे काम करत असून या ठिकाणीही रुग्णांना आपला जीव गमावा लागला आहे असे रुग्णांच्या नातेवाईकांकडून बोलल्या जात आहे.मात्र या तीन ठिकाणी डॉ.संदीप चौरसिया कर्तव्य बजावत असताना शासकीय परवानगी त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून रीतसर घेतली आहे का ? हा एक संशोधनाचा विषय आहे.यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून केल्या जात आहे.

# महाराज ग्रुप यांचा दिनदर्शिका २०२५ प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी रांजणगाव एमआयडीसीसोमनाथ बंटी नवले पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध मोरांचे गाव,मोराची चिंचोलीयेथील युवा उद्योजक, महाराज ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष कुमार महाराज नाणेकर यांच्या वतीने दिनदर्शिका २०२५ प्रकाशन सोहळा चिंचोली येथे पार पडला.दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन शरदचंद्रजी पवार गटाचे नेते श्री. देवदत्त निकम साहेब व भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष श्री.संतोष दादा भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. महाराज ग्रुप नेहमीच सांस्कृतिक व समाजपयोगी उपक्रम राबवत असतात महाराज ग्रुप चे अध्यक्ष यांनी नववर्षाची सुरुवात





आपल्या संकल्पनेतील पं.गणातील प्रत्येक गावातील ग्रामदेवतेच्या प्रतीमेसह दिनदर्शिका २०२५ प्रकाशित केली आहे व दिनदर्शिका आपल्या कारेगाव पंचायत समिति गणातील हक्काच्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठीही नियोजित बांधणी केली असल्याचे त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## पान १ वरून

**जाती...**

परवा रात्री नऊ वाजून वीस मिनिटांनी ही घटना घडली आहे. आमदार सुरेश धस यांनी सदरील घटना ही अपघात नसून घातपात असल्याचे आरोप केले असून परळी पोलीस व थर्मलचे अधिकारी जबाबदार असल्याचेम्हटले आहे.

**शासकीय औद्योगिक ...**

म्हणून नावारूपास आलेल्या माजी विद्यार्थ्यांकडून स्वयंरोजगारा बाबत मार्गदर्शन आणि नेतृत्व विकास यावर चर्चा करण्यात आली.सदरील कार्यक्रमास मा. श्री.डॉ. राजेंद्र गाडेकर (अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय जालना) तसेच मा.श्री.डॉ. चंद्रसेन कोठावळे (प्राचार्य शिवछत्रपती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाचोड) तसेच मा.श्री. डॉ. प्रदीप शिंदे (मानसशास्त्र जिल्हा रुग्णालय जालना) व मा.श्री.डॉ. सोमीनाथ खाडे (उपप्राचार्य राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. मोरे मॅडम यांनी केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान माननीय प्राचार्य डॉ. प्रवीणकुमार उखळीकर यांनी भूषवले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या उप प्राचार्य मा. श्रीमती. रजनी शेळके मॅडम यांनी केले . सदरील कार्यक्रमाचे नियोजन हे संस्थेचे मा. गटनिदेशक श्री. कापसे सर, मा. गटनिदेशक श्री. झुंजे सर, मा. गटनिदेशक श्री. उपाध्ये सर व समस्त निदेशक व कर्मचारी वर्ग यांनी केले. या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

**भाजपच्या अशिश...**

त्यांनी शहरी नक्षलवाद्यांचाही उपयोग करून घेतला यावेळी शेलार यांनी मडकं विकणारा व्यापारी, ढगांची माहिती देणारे पंडीत आणि सल्ला देणारा गाढव, याबाबतची गोष्ट सांगत शरद पवारांवर उपरोधिक टीका केली आहे. शरदट पवारांनी मिळेल त्याला आपला सल्लागार केले. त्यामुळे शरद पवारांच्या पक्षाची अवस्था गाढवाच्या सल्ल्यावर चालणाऱ्या पक्षासारखी झाली आहे. त्यांची ही अवस्था महाराष्ट्राच्या मतदारांनी केलं. त्यासाठी मतदारांचं धन्यवाद, असंही शेलार म्हणाले.मविआवर निशाणा साधताना आशिष शेलार म्हणाले, निवडणूक पूर्वी विरोधकांनी केलेली पोपटपंची मतदारांनी केराच्या टोपलीत टाकली. विश्वविख्यात प्रवक्ते पोपटलाल बोलत होते, मोदींची हवा संपुष्टात आली आहे. महाविकासआघाडी सेंच्युरी करणार, असे ते सांगत होते. आमच्या शपथविधीला या असे ते दोन महिन्यांपूर्वी सांगत होते. पण महाराष्ट्राच्या मतदारांनी त्यांना केराची टोपली दाखवली.

**पाणीटंचाईच्या...**

आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. आ.क्षीरसागर यांनी बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील १६७ गावे, वाडी आणि वस्त्यांची यादीच जिल्हा प्रशासनाकडे पाठविली असून यादीतील नमूद ठिकांणावर पाण्याचे नियोजन करावे असे सांगितले आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

## पान ४ वरून

**आरोग्यदूत...**

आहे.

सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर असलेल्या हृदयरोग, कर्करोग, मणके, गुडगे, अपघात अशा शस्त्रक्रिया त्यांनी सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणल्या. त्यासाठी प्रसंगी त्यांनी पुणे, मुंबईसह राज्यातील नामांकित रुग्णालयांचे दरवाजे ठोठावले. रस्त्यावरील अपघातग्रस्तांसाठी कधी त्यांची गाडी रुग्णवाहिका बनली तर आर्थिक संकटात असलेल्या रुग्णांसाठी आर्थिक मदत करत त्यांचे प्राण वाचविण्याचे काम त्यांनी अहोरात्र केले केले. अपघात किंवा आजाराने अडचणीत सापडलेल्या कुटुंबासाठी हे आरोग्यदूत देवदुताप्रमाणे गरजूनंच्या संकटात धावून आले आहे.

आरोग्य सुविधांबरोबरच आपल्या शेकडो रुग्ण सेवक्कांना हाताशी घेऊन गरजू रुग्णांच्या सेवेसाठी बाजीराव चव्हाण यांनी आरोग्य सेवेचे मोठे जाळे निर्माण केले आहे.

आरोग्यासोबतच त्यांच्या ९ जानेवारी वाढदिवशी दिवशी बाजीराव (दादा) चव्हाण यांनी कुठला ही अनपेक्षित खर्च टाळून बीड जिल्ह्यातील गरजू गरीब अनाथ लहान मुलांना त्यांच्या सहकार्यामार्फत त्यांनी वही पुस्तक शालेय साहित्य वाटप करून एक नावलौकिक उपक्रम राबवला आहे. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र मध्ये अनेक गरजू विद्यार्थ्यांना बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या सहकार्यामार्फत शालेय साहित्यांचे वाटप, आणि अनेक ठिकाणी आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे घेऊन त्यांचा वाढदिवस बीड सह महाराष्ट्रात साजरा करण्यात आला.

अश्या

सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणारे महाराष्ट्राचे लाडके आरोग्यदूत मा. बाजीराव (दादा) चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

शुभेच्छुक – (रुग्णसेवक), रोहित धुरंधरे, रुग्ण मित्र फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, बाजीराव चव्हाण युवा मंच महाराष्ट्र, तथा धर्मवीर प्रतिष्ठान महाराष्ट्रराज्य.जीराव चव्हाण यांनी त्या रुग्णांसाठी नामांकित रुग्णालयात हजारो गरजू रुग्णनांना त्यांना चांगला उपचार ही मिळवून दिला आणि शेकडो रुग्णांचे जीव ही वाचवले आहे.

सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर असलेल्या हृदयरोग, कर्करोग, मणके, गुडगे, अपघात अशा शस्त्रक्रिया त्यांनी सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणल्या. त्यासाठी प्रसंगी त्यांनी पुणे, मुंबईसह राज्यातील नामांकित रुग्णालयांचे दरवाजे ठोठावले. रस्त्यावरील अपघातग्रस्तांसाठी कधी त्यांची गाडी रुग्णवाहिका बनली तर आर्थिक संकटात असलेल्या रुग्णांसाठी आर्थिक मदत करत त्यांचे प्राण वाचविण्याचे काम त्यांनी अहोरात्र केले केले. अपघात किंवा आजाराने अडचणीत सापडलेल्या कुटुंबासाठी हे आरोग्यदूत देवदुताप्रमाणे गरजूनंच्या संकटात धावून आले आहे.

आरोग्य सुविधांबरोबरच आपल्या शेकडो रुग्ण सेवक्कांना हाताशी घेऊन गरजू रुग्णांच्या सेवेसाठी बाजीराव चव्हाण यांनी आरोग्य सेवेचे मोठे जाळे निर्माण केले आहे.

आरोग्यासोबतच त्यांच्या ९ जानेवारी वाढदिवशी दिवशी बाजीराव (दादा) चव्हाण यांनी कुठला ही अनपेक्षित खर्च टाळून बीड जिल्ह्यातील गरजू गरीब अनाथ लहान मुलांना त्यांच्या सहकार्यामार्फत त्यांनी वही पुस्तक शालेय साहित्य वाटप करून एक नावलौकिक उपक्रम राबवला आहे. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र मध्ये अनेक गरजू विद्यार्थ्यांना बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या सहकार्यामार्फत शालेय साहित्यांचे वाटप, आणि अनेक ठिकाणी आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे घेऊन त्यांचा वाढदिवस बीड सह महाराष्ट्रात साजरा करण्यात आला.

अश्या

सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणारे महाराष्ट्राचे लाडके आरोग्यदूत मा. बाजीराव (दादा) चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

शुभेच्छुक – (रुग्णसेवक), रोहित धुरंधरे, रुग्ण मित्र फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, बाजीराव चव्हाण युवा मंच महाराष्ट्र, तथा धर्मवीर प्रतिष्ठान महाराष्ट्रराज्य.

**सीबीएसई आणि...**

स्कूल मध्ये दोन दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. दिनांक १० व ११ जानेवारी २०२५ रोजी आयोजित या कार्यक्रमास मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधून ८० हून अधिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचे अध्यक्ष राम अब्दर तसेच सचिव विजय पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आईएसटीएम, दिल्लीचे उपसंचालक श्री. शैलेश सोनी, श्री. शरद नौटियाल आणि दत्त मेघे वर्ल्ड अकॅडमी, ठाणेचे प्राचार्य श्री. राजीव गर्ग यांनी विशेष मार्गदर्शन केले. बीड, लातूर, नांदेड, परभणी आणि जालना या जिल्ह्यांमधून आलेल्या सीबीएसई संलग्न शाळांमधील प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयक आणि शिक्षकांनी या प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेतला. सीबीएसई पुणे विभागामार्फत येत्या काळात सुमारे १००० शिक्षकांना मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षित केले जाणार आहे. हे प्रशिक्षित शिक्षक महाराष्ट्रातील इतर शाळांमध्ये भविष्यात प्रशिक्षण देतील. देशभरातील सीबीएसई संलग्न २९,००० शाळांमधील १५ लाखांहून अधिक शिक्षकांपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. या नाविन्यपूर्ण पद्धतीमुळे शिक्षकांना प्रशिक्षणासाठी दूर प्रवास करावा लागणार नाही आणि स्थानिक पातळीवर प्रशिक्षण दिले जाणार असल्याने शाळांमधील नियमित अध्यापन सुरळीत चालू राहील.विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्रे आणि इतर विषयांसाठी विषय-केंद्रित प्रशिक्षणाचे आयोजन केले जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत असे हे प्रशिक्षण होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट सहभागींना आवश्यक शैक्षणिक कौशल्यांनी सुसज्ज करणे होते, जेणेकरून ते प्रभावी अध्ययन वातावरण तयार करू शकतील. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीबीएसई विभागीय कार्यालय पुणे येथील प्रशिक्षण प्रमुख मृदला सिंग, समन्वयक पल्लवी माळी, ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रश्मी अरोरा, बीड जिल्हा सीबीएसई समन्वयक तथा गुरुकुल इंग्लिश स्कूल चे प्राचार्य शितल सर्वज्ञ, सीबीएसई जिल्हा प्रशिक्षण समन्वयक तथा सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव चे प्राचार्य अन्वर शेख, उप समन्वयक तथा महावीर इंग्लिश स्कूल कडा येथील प्राचार्य अभिलाष सर, तसेच ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेषपरिश्रमघेतले.

**समता परिषदेची...**

जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी केले आहे. जालना शहरातील संत सावता महाराज भवन येथे जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व समता सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी मार्गदर्शन करताना ड. सुभाष राऊत बोलत होते.या बैठकीला समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, जालना जिल्हाध्यक्ष प्रा.मधुकर झरेकर, युवक अध्यक्ष विशाल धानोरे, शहराध्यक्ष दिपक वैद्य, तोडतले मामा, रवि उकर्डे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना ड. सुभाष राऊत पुढे म्हणाले की, छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज समता परिषद मराठवाडा नव्हे तर महाराष्ट्र आणि भारतात पोहोचली आहे. सर्वत्र समता परिषदेचे पदाधिकारी मोठ्या जोमाने कार्य करीत आहेत. जालना जिल्ह्यात देखील ओबीसी समाज मोठ्या संख्येने आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात आता समता परिषदेची गाव तेथे शाखा, घर तेथे समता सैनिक अभियान राबविले जाणार असून समता परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, शासकीय कर्मचाऱ्यांची बिंदू नियमावलीनुसार पदोन्नती, महिलांचे प्रश्न आदी प्रश्न सोडविण्यासाठी समता परिषदेने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यामध्ये समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी समाजाची ताकद निर्माण करून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांसाठी तयारीला लागावे असे आवाहन देखील ड. सुभाष राऊत यांनी याप्रसंगी केले. बैठकीस जालना जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी व समता सैनिक मोठ्या संख्येनेउपस्थितहोते.

**डिजिटल मीडिया ...**

डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाते. या वर्षी देखील परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य सोहळा येत्या एक १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय श्री.एस.एम. देशमुख यांनी काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी भेट देऊन सेलु पत्रकार संघाची बैठक घेत पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. या आढावा बैठकीसाठी आम्ही स्वतः उपस्थित होतो. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळावा फक्त एक दिवसाचा असणार आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे,उपाध्यक्ष अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारेयांनीकेलेआहे.

**उपजिल्हा रुग्णालय...**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शून्य ते अठरा वर्ष वर्ष वयोगटातील ५८बालकांची वाचादोष शस्त्रक्रिया (टंग टाय सर्जरी) शिबिर पार पडली.यावेळी जनरल सर्जन डॉ.अभिषेक जाधव यांनी शस्त्रक्रिया केली. त्यासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.भुलतज्ञ श्रीमती डॉ.चौरे,बालरोग तज्ञ डॉ.रउफ, अधिपरिचारिका नूतन कोल्हे,श्री. गाजरे आदींनी मदत केली. शस्त्रक्रियेमुळे मुलांचा वाचादोष तसेच बोलण्यातील बोबडेपणा दूर होणार आहे. शस्त्रक्रिया केल्यामुळे पालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक रमेश तांगडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.आंधळे डॉ.मिसाळ डॉ.शेख सिराज डॉ. अरबड डॉ. जाधव डॉ.तिडके डॉ. अंकुश डॉ.पवार डॉ.सबा तसेच औषध निर्माण अधिकारी सय्यद वसीम, प्रवीण जाधव,अमोल झिरमिटे, स्वाती करांडे,आसेफ सय्यद तसेच आरोग्य सेविका रंजना वसावे, नीलम वळवी, डोंगर लालाबाई, अर्चना गवळी, नीता शिंदे आदींनीपरिश्रमघेतले.

**ठरलं! दि.१ ते ९ फेब्रुवारी...**

समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या सर्व स्पर्धाइयत्ता पाहिली ते तिसरी, इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते दहावी या वयोगटात होणार असून प्रत्येक स्पर्धा प्रकारातील प्रत्येक वयोगटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ तीन पारितोषिके काढण्यात येणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना शिल्ड आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या महोत्सवात जी शाळा बक्षीसांची सर्वोच्च संख्या प्राप्त करेल त्या शाळेस मान्यवरांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळा (इर्शीं िलहेश्र े ष िंहश ूशरी लहरािेपीहळ) उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक बहाल करण्यात येणार आहे. याबरोबरच

उत्कृष्ट नृत्य शिक्षक, उत्कृष्ट संगीत शिक्षक, उत्कृष्ट चित्रकला शिक्षक, उत्कृष्ट नाट्य शिक्षक, उत्कृष्ट प्राचार्य तथा उत्कृष्ट उपक्रमशील शिक्षक अशी विशेष पारितोषिक देण्यात येणार आहेत. बीडच्या कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांना चंपावती सन्मान या पुरस्काराचे देखील वितरण करण्यात येणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिलीआहे.

**माजलगावात ...**

मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेली आहे. जिनिंगमध्ये कापुस ठेवण्यास जागा उपलब्ध नाही व वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांचे नुकसान होउ नये याकरीता शेतकरी बांधवांनी१२जानेवारी पासुन ते सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत शासकीय कापुस खरेदीबंदराहिल.

लोकनायक

सोमवार दि.१३ जानेवारी २०२५

३

# कार्यकर्ता संवाद मेळावा: मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसाठीसतीश घाटगे यांची प्रक्रिया उद्योगाची घोषणा

**लोकनायक वृत्तसेवा –** वधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच सतीश घाटगे पाटील यांनी शनिवारी घनसावंगी शहरातील नृसिंह मंगल कार्यालयात कार्यकर्का घेतला. या मेळाव्यास हजारो कार्यकर्ते उपस्थित राहिले. निवडणुकीत जनतेने दिलेला कौल मान्य करून सतीश घटगे यांनी पराभवाची पूर्ण जबाबदारी स्वतः स्वीकारत कार्यकर्त्यांना पुन्हा नव्या जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले.

लवकरच आपली राजकीय भूमिका स्पष्ट करणार असल्याचेही त्यांनी या मेळाव्यात सांगितले. दरम्यान मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रक्रिया उद्योगाची घोषणा त्यांनी या मेळाव्यात केली असून हा प्रकल्प येत्या एका वर्षात पूर्ण होणार आहे.

विधानसभा निवडणुकीत जनतेच्या आग्रहाखात सतीश घाटगे पाटील यांनी अपक्ष निवडणूक लढवली. या निवडणुकीत जनतेचे मोठे पाठबळ त्यांना मिळालं. सतीश घाटगे पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्याच्या बळावर विधानसभा निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळवली. निवडणुकीतील पराभवाने खचून न जाता सतीश घाटगे पाटील यांनी पराभवाची सर्वस्वी जबाबदारी स्वतः स्वीकारली व कार्यकर्त्यांना पुन्हा नव्या जोमाने

## लवकरच जाहीर करणार आगामी राजकीय भूमिका

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आवाहन केले.या मेळाव्यासअंबड , जालना आणि घनसावंगी तालुक्यातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

राजकीय भूमिकेसोबत कार्यकर्ते ठाम

कार्यकर्ता संवाद मेळाव्यात जमलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत या मेळाव्यात व्यक्त केले सतीश घाडगे पाटील येणाऱ्या काळात जी राजकीय भूमिका घेतील, ती भूमिका मान्य करून साथ देण्याचा निर्धार या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी केला.

मोसंबी प्रक्रिया उद्योगाची मुहूर्तमेढ

जालना जिल्हा हा मोसंबी उत्प-



ादक जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. जालना जिल्ह्यातील मोसंबीला जीआय मानांकन देखील प्राप्त झालेले आहे. परंतु असे असताना मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. तसेच नैसर्गिक संकटामुळे मोसंबी उत्पादक शेतकरी त्रस्त आहेत. मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्या मोसंबीला सातासमुद्रा पार पोहोचवून चांगला भाव मिळवून देण्याच्या उद्देशाने सतीश घाटगे पाटील यांनी मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोसंबी प्रक्रिया उद्योग सुरू करण्याची घोषणा केली. येणाऱ्या एका वर्षानंतर हा प्रक्रिया उद्योग कार्यरत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे जालना जिल्ह्यातील शेकडो युवकांना रोजगार मिळणार असून शेतकऱ्यांना त्यांच्या मोसंबीला चांगला भाव देखील मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या मोसंबीला चांगला भाव मिळवून देण्याबरोबरच मोसंबीचे उत्पादन वाढवणे व मोसंबिवर येणारे नैसर्गिक संकटातून वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना हा मोसंबी प्रक्रिया उद्योग मदत आणि कृषी तज्ञांच्या मदतीने मार्गदर्शन व सल्ला देणार आहे.



# मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा दुहेरी सत्कार सामाजिक कार्यकर्त्यांनी मानले आभार

बीड (प्रतिनिधी) – शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी दुहेरी सत्कार केला.

एस.एम.युसूफ़ यांनी दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी पत्रकारिता क्षेत्रात ११ वर्ष पूर्ण केले. यामुळे गेल्या ११ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात एक मुक्तपत्रकार म्हणून देत असलेल्या योगदानाबद्दल तसेच शासनाने घेतलेल्या १०० रुपयांचा बॉण्ड बंद करून ५०० रुपयांचा बॉण्ड लागू केलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्यांना बॉण्ड वापरताना आर्थिक भुर्दंड बसत होता.

शिवाय ५०० रुपयाचे बॉण्ड मुद्रांक विक्रेत्याकडे मिळतही नव्हते. यामुळे एस.एम.युसूफ़ यांनी या बाबीची बातमी प्रसिद्धी



माध्यमात दिली. सदरील बातमी ही दिनांक ०९ व १० डिसेंबर २०२४ रोजी अनेक स्थानिक तसेच विभागीय वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाली होती. याची दखल शासन–प्रशासन दरबारी घेतली गेल्याने आता ५०० रुपयाचाच नाही तर १०० रुपयांचा बॉण्ड

ही शासकीय–प्रशासकीय कामासहित कुठलेही प्रमाणपत्र काढण्याकरिता देण्याची गरज नसल्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षकांनी स्पष्टपणे काढल्याने सर्वसामान्यांना बसणारा आर्थिक फटका संपुष्टात आला आहे. या दोन्ही बाबींमुळे बीड शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी एस.एम.युसूफ़ यांचा शाल, पुष्पगुच्छ देत पेढे भरवून ह्रदयी सत्कार करत आभार व्यक्त केले आणि पुढील कार्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सेवानिवृत्त नायब तह–सीलदार मच्छिंद्र भालेराव, ज्योतिबा नन्नवरे, बाळू कांडेकर आणि राजू पठाण यांची विशेष उपस्थिती होती.

# आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयात राजमाता जिजाऊ जयंती साजरी

**लोकनायक वृत्तसेवा –** लोहा प्रतिनिधि राजमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त आज लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या सौ सुभाष या संपर्क कार्यालयात जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष जिवनराव पाटील घोगरे, माधव पावडे, कंधार कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती संजय देशमुख कौठेकर, उपसभापती सुधाकरराव कौसल्ये, माजी पप्पु जाधव, रावसाहेब पाटील, हणमंतराव लोंढे, हणमंत धुंळगडे, हिरामन देशमुख,



सभापती बाबुअप्पा मुक्कनवार, माजी सभापती लक्ष्मणराव बोडके, डॉ.पंजाबराव देशमुख, सुनिल मोरे, प्रल्हादराव उमाटे, विश्वनाथराव इंगळे, प्राचार्य पंजाबराव चव्हाण, राजेश पावडे, अभिजित भालके यांच्यासह अनेकांची उपस्थिती

# मंथन

काही दिवसांपूर्वी एक चांगली पोष्ट माझ्या वाचण्यात आली.आपल्यापैकी ती अनेकांना आली असेल.खरे पाहिले असता ही पोष्ट फार महत्वाची आहे.त्या पोष्टवर प्रतिक्रिया पण अपेक्षित होत्या. पण एकही प्रतिक्रिया न आल्याने ( किंवा माझ्या वाचण्यात न आल्याने ) अनेक जणांनी त्याकडे दुर्लक्ष केले असे वाटते. जीवनात आपण काय कमावले आणि काय गमावले याचा विचार ज्या गंभीरपणे व्हायला हवा तो कधीच केल्या जात नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल.

# नवनाथ अर्बन पतसंस्थेच्या उत्कृष्ट कार्याची जिल्ह्यस्तरावर घेतली दखल

कुंभार पिंपळगाव लोकनायक वृत्तसेवा –

सहकार भारती जिल्हा जालना ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा

उत्कृष्ठ नागरी पतसंस्था पुरस्कार २०२५ हा प्रथम क्रमांकाचा महत्त्वपूर्ण पुरस्कार नवनाथ अर्बन को– ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. या आपल्या संस्थेला पुढील मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये देण्यात आला त्यामध्ये सदानंदजी वूइके साहेब (वि.ले स.सं.मुख्यालय पुणे), मा.श्री.गणेशजी निमकर साहेब(स.तज्ञ पुणे) परमेश्वर



वरखडे साहेब(जि.उ.स.सं.जालना),मा. धनंजय चव्हाण (जि.वि.ले.स.सं.जालना),व.र्सा चनजी वाणी साहेब(अध्यक्ष स.भारती जालना),या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते आज दिनांक ११.०१.२०२५ रोजी.शोर्य लॉन्स,जालना येथे प्राप्त पुरस्कार स्विकारताना नवनाथ अर्बन को–ऑप.क्रेटिड सो लि चेकर्मचारी वर्ग.

# डोंगरकिन्ही येथे राजमाता जिजाऊ मांसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

डोंगरकिन्ही/प्रतिनिधी –

पाटोदा तालुक्यातील डोगरकिन्ही येथे राजमाता जिजाऊ मांसाहेब तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.येथिल छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजमाता जिजाऊ मांसाहेब यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी सर्व ग्रामस्थ उप–स्थित होते.याप्रसंगी डोंगरकिन्ही येथिल माजी सैनिक पाटोळे मेजर तसेच अरुणकाका येवले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.पत्रकार दयानंद सोनवणे यांनी जिजाऊंच्या जिवनावर महत्वाचे भाषण केले.यावेळी उपस्थित जनसमुदायाने घोषणा देऊन . तोफांची सलामी देण्यात आली.याप्रसंगी बहुसंख्येने ना–गरीकांनी जिजाऊ मांसाहेब यांना



अभिवादन केले.तर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच आण्णासाहेब येवले व उपसरपंच प्रशांत येवले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ मळेकर, कैलास मळेकर,योगेश येवले,विजुबापु काथवटे, प्रभाकर येवले बापु, शहाबाज शेख,व ग्रामस्थउप–स्थित होते.

## कुंभार पिंपळगाव येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव साजरा, ८६ जणांनी रक्तदान केले

कुंभार पिंपळगाव लोकनायक वृत्तसेवा –

१२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ चौक मातोश्री कॉर्नर कुंभार पिंपळगाव या ठिकाणी जिजाऊ जन्मोत्सव साजरा करण्यात आला त्या कार्यक्रमाप्रसंगी ८६ जणांनी रक्तदान केले, अमोल भैया तौर शिवव्याख्याते



यांचे भव्य दिव्य असे व्याख्यान झाले.या कार्यक्रमासाठी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते जिजाऊ यांचे वंशज तसेच राजेंद्र जाधवराव देशमुख घनसावंगी ही उपस्थित होते.यावेळी जिजाऊ मातेच्या स्मारकाचे पूजन कुंभार पिंपळ–गाव येथील जेष्ठ नागरिक वसंत बप्पा उढान, विठ्ठल बापू कंटुले, डॉ. सतीश देशमुख यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर महिला मंडळ उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी कुंभार पिंपळगाव सर्कल मधील सर्व जाती धर्मातील समाज बांधव उपस्थि तहोते

# काँग्रेसचे युवा नेते नितीनकुमार जेथलिया शेकडो कार्यकर्त्योंसह शिवसेनेत !

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत रंगला प्रवेश सोहळा

**लोकनायक वर्तसेवा**

परतुर मंठा मतदारसंघाचे काँग्रेसचे युवा नेते नितीनकुमार जेथलिया यांनी दिनांक ९ जा–नेवारी रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते शेकडो कार्यकर्त्योंसह शिवसेना शिंदेग गटात प्रवेश घेतला. आनंद आश्रम, टेंभी नाका,ठाणे येथे रंगलेल्या या प्रवेश सोहळयात मा.मंत्री खा.संदिपान भुंबरेसह नेत्यांची उपस्तीथी होती.

या प्रवेशाबद्धल नितीनकुमार जेथलिया म्हणाले की, गेल्या अनेंक वर्षापासुन मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांच्यासोबत काँग्रेसचे इमानद–ारीने काम करत कार्यकर्त्योची मोठी फळी निर्माण केली. व काँग्रेस पक्षाला चांगले दिवस आणले मात्र शब्द देउन ऐन वेळेला वरीष्टांनी महाविकासघाडीत मित्रपक्षाला जागा सोडत सुरेशकुमार जेथलिया यांना उमेदवारी पासुन डावलले.तरी देखील केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव जेथलिया साहेंबानी विधानसभेत अपक्ष लढत देऊन ताकद



दाखवली.मराठवाडयाचे नेते अर्जुनरावजी खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यकर्त्यांनी राज्याचे कर्तबगार नेतृत्व मा.उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश घेतला असल्याचे ते म्हणाले .याबाबत बोलतांना पुढे म्हणाले की मा.आ.सुरेशकुमार जेथलिया हे देखील लवकरच निर्णय घेणार असून मतदारसंघात मोठया समारंभासह व सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

खरे तर आम्ही स्वगृही परतलो असल्याचे समाधान वाटत असल्याचे म्हणत एकनाथराजी शिंदे हे कार्यकर्त्यांची जाण असणरे नेते व कामाची दखल घेणारे नेतृत्व असून निर्णय घेण्याची क्षमता व कार्य करण्याची धमक असणारे नेते असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. अशा नेत्याच्या नेतृत्व–ाखाली काम काण्यास आम्हा कार्यकर्त्योना निश्चित समाधान वाटणार असल्याचे ते म्हणाले.सर्व वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा परतुर मंठा मतदारसंघात शिवसेनेचा झंझावत निर्माण करणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली.

दरम्यान नितीनकुमार जेथलिया यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प.सदस्य इद्रजित घनवट,आशिषजी जेथलिया,मंठा काँग्रेस कार्याध्यक्ष योगेश अवचार,काँग्रेसचे उपतालुका प्रमुख मंजुळदास सोळंके,कार्याध्यक्ष सिद्धेश्वर अंभुरे,युवक काँग्रेस उपाध्यक्ष सचिन बोंबले मा.पं.स.सभापती संतोष पवार,पांगरी गोसावी सरपंच मानकर,मा.नगराधक्ष अविनाश शहाणे, दिलीपरावजी चव्हाण,तारेखजी सिद्धीकी ,विकास खुळे,अमेर खा पठाण या पदाधिकाऱ्यांसह शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला आहे.

## चिमुर येथे होणार्या शिक्षकेत्तर महामंडळाच्या ५२ व्या राज्यस्तरीय अधिवेशनास कर्मचार्यांनी उपस्थित रहावे- जिल्हाध्यक्ष संजय डावकर

बीड दि.११ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर महामंडळाचे ५२ वे राज्यस्तरीय अधिवेशन चंद्रपुर जिल्ह्यातील चिमुर येथे १९ जा–नेवारी रोजी होत आहे. या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर यांनी केले आहे.

शिक्षकेत्तर महामंडळाच्या अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यातून हजारो शिक्षकेत्तर बंधु–भगिनी उपस्थित राहणार असल्याची माहिती शिक्षकेत्तर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर

यांनी दिली असुन माध्यमिक शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न महामंडळाच्या माध्यमातून या पुर्वी सोडवण्यात आले असुन उर्वरित प्रलंबित प्रश्न देखील लवकरात लवकर महामंडळाच्या माध्यमातून सोडवण्यात येतील.



या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष शेख मोहसीन, नंदकुमार शिंदे, सचिव नामदेव वाघ, सहसचिव दत्तात्रय आगवान, कार्याध्यक्ष अविनाश कळंबकर, कोषाध्यक्ष सतिष महाजन, संघटक अर्जुन सानप आदिंच्या वतीने करण्यात आले आहे.



**जयजिजाऊजयशिवराय स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी बीड शहरातील राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या अर्धाकृती पुतळ्याला विनम्र अभिवादन केले व जिजाऊ जन्मोत्सवानिमित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड, मुकेशजी घुमरे, मनोज भैय्या डोंगरे सर्व उपस्थित होते..!!**



## विवेकानंद प्राथमिक,परतूर शालेत जिजामाता व विवेकानंद जयंती साजरी

कटू सत्या

आपणामुळे लोकांच्या डोळ्यात पाणी यावे. असे कार्य कदापि आपणाकडून न घडावे.याचाच अर्थ आपणाकडून मोठे पाप घडले हे समजून घ्यावे लोकांनी आपणासाठी रडावे मात्र ते निर्वाना पश्चात असावे ही आठवण आपल्या महत्पुण्याचे कार्य ठरावेम्हणूनच यासाठी आपले असे कार्य असावे की इतर दुसरी कोणतीही प्रार्थना करण्याची वेळ न यावे आणि मरणोपरांत आपल्या आत्म्याला शांतता मिळावे

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
४
सोमवार दि.१३ जानेवारी २०२५

**सुचना**

दैनिक **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.

– संपादक

## आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम संप्पन्न

# आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी रुग्णांच्या सेवेसाठी ठोठावले नामांकित रुग्णालयांचे दरवाजे

## सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणारा आरोग्यदूत – बाजीराव चव्हाण

**लोकनायक वृत्तसेवा –**
माझ्या बीड जिल्ह्यातील कोणतीही व्यक्ती आरोग्य सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी बीड चे कर्तव्यदक्ष आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण हे गरजू गरीब रुग्णासाठी अहोरात्र कष्ट घेत आले आहेत. बीड जिल्यासह सर्वच तालुक्यातील रुग्णांच्या पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रियेसाठी ते आपली राजकीय ताकद ही पणाला लावताना दिसतात. आरोग्य सुविधेअभावी कोणाचाही जीव धोक्यात जाऊ नये यासाठी झटणारे व त्यासाठी केलेल्या या कामांमुळे त्यांना बीड सह महाराष्ट्राचे आरोग्यदूत म्हटले तरी वावगे ठरणार नाही.
आपल्या बीड जिल्यातील सर्वसामान्य व्यक्ती वैद्यकीय उपचारांपासून कधीच वंचित राहू नये. यासाठी आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण यांनी बीड जिल्यातील खेडे पाडे, वाड्या, वस्त्या सह गावोगावी फिरता दवाखाना चालू करून गरजू रुग्णांची तपासणी व त्यांना मोफत औषधी देऊन आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि गरजू गरीब माणसाची सेवा केली. ग्रामीण भागांमध्ये शेतकरी, शेतमजूर आदींना आरोग्य सुविधांसाठी फिरता दवाखाना चालू करून आपली रुग्ण वहीके मार्फत गरजूना मोफत घरपोच सुविधा दिल्या आहेत. तसेच इतरही मोठ्या गावांमध्ये प्राथमिक उपच–ारासाठी आपल्या शेकडो रुग्ण सेवकामार्फत लोकांच्या सेवेसाठी शेकडो आरोग्य शिबीरे राबवली आहेत. महाराष्ट्र सह बीड जिल्यात आरोग्य सेवा उभारणी करण्यामध्ये बीडचे स ं व े द न श ी ल आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. हे सर्व बीड जिल्ह्यासह उभ्या महाराष्ट्राला माहीतच आहे.
सोबतच एखादा गरजू रुग्ण उपचारासाठी मुंबई पुणे अशा मोठ्या शहरांत गेल्यास त्यावेळी एका फोनवर आरोग्यदूत बासर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणारा आरोग्यदूत – बाजीराव चव्हाण
आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक



कार्यक्रम संप्पन्न.
आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी रुग्णांच्या सेवेसाठी ठोठावले नामांकित रुग्णालयांचे दरवाजे.
बीड :
माझ्या बीड जिल्ह्यातील कोणतीही व्यक्ती आरोग्य सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी बीड चे कर्तव्यदक्ष आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण हे गरजू गरीब रुग्णासाठी अहोरात्र कष्ट घेत आले आहेत. बीड जिल्यासह सर्वच तालुक्यातील रुग्णांच्या पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रियेसाठी ते आपली राजकीय ताकद ही पणाला लावताना दिसतात. आरोग्य सुविधेअभावी कोणाचाही जीव धोक्यात जाऊ नये यासाठी झटणारे व त्यासाठी केलेल्या या कामांमुळे त्यांना बीड सह महाराष्ट्राचे आरोग्यदूत म्हटले तरी वावगे ठरणार नाही.
आपल्या बीड जिल्यातील सर्वसामान्य व्यक्ती वैद्यकीय उपचारांपासून कधीच वंचित राहू नये. यासाठी आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण यांनी बीड जिल्यातील खेडे पाडे, वाड्या, वस्त्या सह गावोगावी फिरता दवाखाना चालू करून गरजू रुग्णांची तपासणी व त्यांना मोफत औषधी देऊन आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि गरजू गरीब माणसाची सेवा केली. ग्रामीण भागांमध्ये शेतकरी, शेतमजूर आदींना आरोग्य सुविधांसाठी फिरता दवाखाना चालू करून आपली रुग्ण वहीके मार्फत गरजूना मोफत घरपोच सुविधा दिल्या आहेत. तसेच इतरही मोठ्या गावांमध्ये प्राथमिक उपच–ारासाठी आपल्या शेकडो रुग्ण सेवकामार्फत लोकांच्या सेवेसाठी शेकडो आरोग्य शिबीरे राबवली आहेत. महाराष्ट्र सह बीड जिल्यात आरोग्य सेवा उभारणी करण्यामध्ये बीडचे संवेदनशील आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. हे सर्व बीड जिल्ह्यासह उभ्या महाराष्ट्राला माहीतच आहे.
सोबतच एखादा गरजू रुग्ण उपचारासाठी मुंबई पुणे अशा मोठ्या शहरांत गेल्यास त्यावेळी एका फोनवर आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी त्या रुग्णांसाठी नामांकित रुग्णालयात हजारो गरजू रुग्णांना त्यांना चांगला उपचार ही मिळवून दिला आणि शेकडो रुग्णांचे जीव ही वाचवले **पान २ वर**



छत्रपती राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना मानवंदना देताना ड.गोविंद शिराळे पाटिल शिव प्रेमी.

## सीबीएसई आणि आईएसटीएम द्वारे 'ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स' संपन्न

### नाविन्यपूर्ण शिक्षणावर दोन दिवसीय कार्यशाळा

**लोकनायक वृत्तसेवा –**
केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि इन्स्टिट्यूट ऑफ सेक्रेटरिएट ट्रेनिंग अँड मॅनेजमेंट (आईएसटीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथील ज्ञानेश्वर पब्लिक **पान २ वर**



## समता परिषदेची गाव तेथे शाखा, घर तेथे समता सैनिक अभियान राबवणार – सुभाष राऊत

**लोकनायक वृत्तसेवा –**
येणाऱ्या काळात समता परिषदेची गाव तेथे शाखा घर तेथे समता सैनिक अभियान समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष आ. छगनर–ावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून समता सैनिकांनी




आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या तयारीला लागावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड **पान २ वर**



**माजलगाव – लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि.सुंदरनगर, तेलगाव कार्यालयात राज माता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली प्रसंगी जिजाऊ यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करतांना कारखाना सचिन सुरेश लगड, मार्केटींग मैनेजर विष्णु पंत साबळे, लिगल प्रमुख अशोक पाटील, विष्णु पंत मोरे,तुकाराम नरवाडे,दिगांबर विर,दत्तात्रय वाळे,महादेव मुरकुटे, वांडरे,संजय भोसले,वाशिंबे.**

## डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी

### सहभागी व्हावे – प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे – सेलु येथे पुरस्कार वितरण सोहळा

**लोकनायक वृत्तसेवा –**
मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून



या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील **पान २ वर**

## उपजिल्हा रुग्णालय येथे वाच–ादोष शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा** –दिनांक ११, जानेवारी२०२४रोजी उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ,निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ.तांदळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अभय गोंदीकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे यांच्या मार्गदर्शनाखाली **पान २ वर**





**सोमवारपासून श्री.श्रृंगेरी देवी यात्रेस प्रारंभ**
**आष्टी व पाटोदा सरहद्दीवर बालाघाटच्या रांगांमध्ये प्रसन्न वातावरण सुंदर असे श्री.श्रृंगेरीदेवीचे मंदिर आहे या जागृत देवीच्या यात्रा उत्सव सोमवार दिनांक १३ जानेवारी रोजी सुरु आहे ते २९ जानेवारी पर्यंत हा यात्रा उत्सव पंधरा दिवस चालणार आहे.श्रृंगेरी देवी यात्रेमध्ये आष्टी तालुक्यातील भरपूर गावातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात व १४ जानेवारी रोजी दुपारी भव्यमलाचा हंगामा होणार आहे अशी माहिती श्रृंगेरी देवी समिती ब्रह्मगाव च्या वतीने देण्यातआली आहे**

## माजलगावात शासकीय कापुस खरेदी बंद

**लोकनायक वृत्तसेवा –**
– येथील बाजार समिती अंतर्गत असलेल्या शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने तसेच ढगाळ वातावरणामुळे सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत कापुस खरेदी बंद राहणार असल्याने शेतक–यांनी कापुस विक्रीस आणु नये असे आवाहन प्रसिध्दि पत्रकाद्वारे बास कडुन करण्यात आले आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे कि, बाजार समिती अंतर्गत मनकॉट जिनिंग, पुर्वा जिनिंग, कुणाल जिनिंग,कॉटसिट जिनिंग,एच. जे. कॉटन,महाराष्ट्र जिनिंग पात्रुड याठिकाणी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर सिसीआयकडुन कापसाची **पान २ वर**

## ठरलं! दि.१ ते ९ फेब्रुवारी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा

### शिवसेना जिल्हाप्रमुख जगताप, मुळूक, गलधर यांच्या हस्ते चंपावती महोत्सवाचे पोस्टर विमोचन!

बीड, प्रतिनिधी–
बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गत दोन वर्षांच्या अफाट यशानंतर जिल्ह्याभरातील अनेक शाळांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, पालक बालकलाकार आणि कलाप्रेमींच्या खास आग्रहास्तव याहिवर्षी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान आठ दिवासीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य–दिव्य आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे पोस्टर विमोचन काल दि. १२ जानेवारी २०२४ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यादरम्यान चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचा आभारपूर्वक सत्कार केला. पोस्टर विमोचनाच्या कार्यक्रमानंतर महोत्सवाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत बीड शिवसेनेच्या तिन्ही जिल्हाप्रमुखांनी मिळून महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व बाल कलाकारांची गैरसोय होऊ नये यासाठी सूचना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बीड शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांच्यासह चंपावती महोत्सवाचे व्यवस्थापक कलावंत लक्ष्मीकांत दोडके व अनिकेत कांबळे उपस्थित होते. यावर्षी चंपावती महोत्सवामध्ये समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, फॅमिली नृत्य, एकपात्री अभिनय, **पान २ वर**

This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher **Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD Chief Editor - Abhijeet Gaikwad** at **Indradhanush Printers and publishers** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.**The office of Dainik Loknayak** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **भारत देविदास गायकवाड, कार्यकारी–संपादक – अभिजीत गायकवाड सहसंपादिका – सौ .अक्षरा अक्षय मुळे.** यांनी **इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स**, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. **पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत)** Mobile: 9850165082 / 9420406019 **E:mail : dainikloknayak@gmail.com**